धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## रुईभर येथे शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जून -**



जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे यांच्या हस्ते शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आढावा घेत शिवराज्याभिषेक सोहळ्याचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमास सुभाषदादा कोळगे, रामदास आण्णा कोळगे, राजनारायण कोळगे, शिवकन्या साळुंके, संतोष कपाळे, नानासाहेब शेलार, काकासाहेब डोंगरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# कडकनाथवाडी साठवण तलावाला वाढती गळती; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.६ जून -**

वाशी तालुक्यातील कडकनाथवाडी येथील साठवण तलाव क्रमांक २ ला लागलेली गळती दिवसेंदिवस वाढत असून परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तलावाच्या एका बाजूने सुरू असलेली गळती थांबण्याऐवजी आता दुसऱ्या बाजूनेही मोठ्या प्रमाणात पाणी वाहू लागल्याने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, तलावाचे बांधकाम पूर्ण झाल्यापासूनच गळतीची समस्या कायम आहे. याबाबत अनेक वेळा संबंधित विभागाचे लक्ष वेधण्यात आले असून अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणीही केली आहे. तलावातून पाणी झिरपत असल्याचे संबंधित विभागाकडून मान्य करण्यात आल्याचा दावा ग्रामस्थांनी

### बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह; दुरुस्तीची मागणी



केला आहे. मात्र, गळती रोखण्यासाठी अद्याप कोणतीही प्रभावी आणि कायम स्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नाही. सध्या उन्हाळ्याच्या काळातच तलावातून मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्याने जलसाठ्यावर परिणाम होत आहे. आगामी पावसाळ्यात तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यास गळतीचा वेग आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे भविष्यात कोणताही धोका निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, तलावाचे काम पूर्ण झाल्यानंतरही सातत्याने गळती सुरू असल्याने बांधकामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केले का, असा सवालही ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच तलावातील गळती कायमस्वरूपी थांबवण्यासाठी तातडीने तांत्रिक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी कडकनाथवाडी व परिसरातील नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे.

# अनधिकृत पूजारी व्यवसाय करणारे दोघे पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ जून -**




सध्या अधिक मास सुरू असल्याने श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक तुळजापूर येथे येत आहेत. भाविकांची कोणत्याही प्रकारे फसवणूक होऊ नये तसेच धार्मिक विधी अधिकृत पुजाऱ्यांकडूनच पार पडावेत, यासाठी श्री तुळजाभवानी मंदिर प्रशासनाने अनधिकृत पूजारी व्यवसाय करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम हाती घेतली आहे.

यासाठी मंदिर प्रशासनाने विशेष पथकाची स्थापना केली असून त्यामध्ये सहायक व्यवस्थापक (धार्मिक), सुरक्षा निरीक्षक, सुरक्षा पर्यवेक्षक तसेच मंदिर संस्थानचे दोन शिपाई यांचा समावेश आहे. हे पथक मंदिर परिसरात नियमित पाहणी करून अनधिकृतपणे पुजारी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींवर लक्ष ठेवत आहे.

दि. ५ जून रोजी सकाळी पथकाने केलेल्या तपासणीदरम्यान अमर वसंतराव शेळके आणि रवी दत्तात्रय शिरसाट हे दोघे अनधिकृतपणे पुजारी व्यवसाय करत असल्याचे आढळून आले. संबंधित व्यक्ती मंदिरातील नियमांचे उल्लंघन करत असल्याचे तसेच त्यांच्या कृतीमुळे मंदिरातील शिस्त आणि व्यवस्थापनावर परिणाम होत असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मंदिर प्रशासनाने संबंधित दोन्ही व्यक्तींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी तुळजापूर पोलिस ठाण्यात दाखल केले आहे.

अधिक मासाच्या पार्श्वभूमीवर भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता मंदिर परिसरात शिस्त राखण्यासाठी आणि भाविकांची फसवणूक टाळण्यासाठी अशा कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचे मंदिर प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## संक्षिप्त वृत्त...



### लोहारा तालुक्यातील पाच शिक्षकांचा राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव

**लोहारा, ६ जून -**

पनवेल येथे राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय अधिवेशनात लोहारा तालुक्यातील पाच शिक्षकांचा राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मान करण्यात आला. कानेगाव येथील मच्छिंद्र बोकडे, माकणी येथील गौरीशंकर कलशेट्टी आणि माळेगाव येथील पंडित राठोड यांना महात्मा ज्योतिबा फुले राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार, तर मार्डी येथील वर्षा चौधरी आणि जेवळी येथील मुक्ता माळी यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या यशाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.



### कै. व्यंकटेश हंबीरे यांची पुण्यतिथी श्रद्धापूर्वक साजरी

**धाराशिव, ६ जून -**

डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेच्या वतीने जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कै. व्यंकटेशजी (आबा) हंबीरे यांची पुण्यतिथी श्रद्धापूर्वक साजरी करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे यांच्या हस्ते आबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वक्त्यांनी आबा हंबीरे यांनी ग्रामीण भागातील शिक्षणविकासासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव केला. कार्यक्रमास रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंके, संतोष कपाळे, नानासाहेब शेलार, काकासाहेब डोंगरे यांच्यासह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. गणेश शेटे यांनी केले.



### 'विभागीय सुसंवाद २०२६'ला विद्यार्थी-पालकांचा प्रतिसाद

**धाराशिव, ६ जून -**

महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल), मुंबई आणि तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विभागीय सुसंवाद २०२६' या मार्गदर्शन कार्यक्रमास विद्यार्थी व पालकांचा प्रतिसाद मिळाला. अभियांत्रिकी, वैद्यकीय व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात नानासाहेब फटांगरे, सिद्धेश्वर नर, कुणाल देवकर, शार्दुल कदम, प्रमोद झरकर, प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने व प्रशांत गजरकर यांनी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, चॉईस कोड निवड, परसेंटाइल-परसेंटेजमधील फरक विविध संधींबाबत माहिती दिली.

## खूनप्रकरणातील फरार आरोपीला अटक करा; अन्यथा अमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ जून -**

येथील उद्योगपती अनंत रसाळ यांचे पुत्र कृष्णा अनंत रसाळ यांच्या खून प्रकरणातील फरार आरोपी प्रसाद रोचकरी याला तात्काळ अटक करावी, अन्यथा कुटुंबासह पोलिस मुख्यालयासमोर अमरण उपोषणास बसण्याचा इशारा रसाळ कुटुंबीयांनी दिला आहे.

याबाबत त्यांनी ५ जून रोजी जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन सादर केले. निवेदनानुसार, ३ मे रोजी कृष्णा रसाळ यांचा खून झाला असून या प्रकरणात प्रसाद रोचकरी व प्रथमेश कांबळे यांनी संगनमत करून गुन्हा केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तुळजापूर पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल असून प्रथमेश कांबळे याला अटक करण्यात आली आहे. मात्र मुख्य आरोपी असलेला प्रसाद रोचकरी अद्याप फरार असून त्याला अटक करण्यास पोलीस जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. रोचकरी याच्यावर यापूर्वीही अपहरण, मारहाण व जुगार कायद्यांतर्गत विविध गुन्हे दाखल असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# कळंबला नवे पोलीस निरीक्षक : वाढत्या गुन्हेगारीला बसणार का लगाम?

### नागरिकांच्या अपेक्षा उंचावल्या

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.६ जून -**

कळंब शहरासह तालुक्यात वाढती गुंडगिरी, मोबाईल चोरी, महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी, सावकारांचा त्रास, महिलांची छेडछाड, वाहतूक कोंडी आणि विविध अवैध धंद्यांमुळे नागरिक त्रस्त झाले असताना, धाराशिव सायबर सेलमध्ये कर्तव्यदक्ष व धडाकेबाज कामगिरीची छाप पाडणारे पोलीस निरीक्षक शकील शेख यांनी कळंब पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे नागरिकांमध्ये नव्या आशा निर्माण झाल्या आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून कळंब बसस्थानक परिसर, महाविद्यालये, क्लासेस तसेच शहरातील विविध भागांमध्ये चोरी, पाकिटमारी, घरफोडी, महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून नेण्याच्या घटना वाढल्या होत्या. याशिवाय बाजारपेठेतील दादागिरी, टवाळखोर टोळ्यांचा त्रास आणि वाहतूक कोंडीमुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण होते.



अनेक वेळा तक्रारी करूनही गुन्ह्यांचा तपास अपेक्षित गतीने होत नसल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त केली जात होती. अशा परिस्थितीत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शकील शेख यांच्यावर कळंब पोलीस ठाण्याची जबाबदारी सोपवली आहे. सध्या तालुक्यात अवैध वाळू उपसा, मटका, जुगार, अवैध दारू विक्री आणि सावकारीसारख्या बेकायदेशीर प्रकारांविरोधात प्रभावी कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या अवैध धंद्यांवर पोलिसांचा धाक निर्माण होईल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

नव्या पोलीस निरीक्षकांसमोर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, वाढत्या गुन्हेगारीला आळा घालणे, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न सोडवणे आणि वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करणे ही मोठी आव्हाने आहेत. विशेषतः मोटारसायकलवरून मंगळसूत्र चोरी करणाऱ्या टोळ्या, टवाळखोर गट आणि सावकारीच्या जाळ्यात अडकलेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी कोणती पावले उचलली जातात, याबाबत उत्सुकता आहे.

शकील शेख यांच्या धडाकेबाज एंट्रीमुळे कळंब तालुक्यातील गुन्हेगारीवर कितपत नियंत्रण मिळते आणि नागरिकांच्या अपेक्षा कितपत पूर्ण होतात, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# झाडेझुडपे हटवा : 'बोरी धरण' नावाला पुन्हा झळाळी द्या

### पाटबंधारे विभागाकडे नागरिकांची मागणी; धरणातील उर्वरित पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याचीही अपेक्षा...



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ जून -**

नळदुर्ग येथील ऐतिहासिक बोरी धरणाच्या बंधाऱ्यावर मोठ्या प्रमाणात झाडेझुडपे उगवली असून त्यामुळे बंधाऱ्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पाटबंधारे विभागाने तातडीने ही झाडेझुडपे हटवून बंधारा स्वच्छ करावा, तसेच बंधाऱ्यावर कोरण्यात आलेले 'बोरी धरण' हे नाव पुन्हा ठळकपणे दिसण्यासाठी त्यावरील झाडे काढून पांढरा रंग द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सुमारे ५० ते ६० वर्षांपूर्वी उभारण्यात आलेले बोरी धरण हे नळदुर्ग, तुळजापूर, अणदूरसह परिसरातील ८ ते ९ गावांसाठी जीवनवाहिनी ठरले आहे. अनेक वर्षांपासून या धरणाच्या पाण्यावर हजारो नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गरज भागत असून हजारो हेक्टर शेतीही सिंचनाखाली आली आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर परिसरातील शेती आणि पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम होत असते. मात्र सध्या धरणाच्या बंधाऱ्यावर मोठमोठी झाडे आणि झुडपे उगवली आहेत. या वाढलेल्या वनस्पतींमुळे बंधाऱ्याच्या संरचनेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

त्यामुळे पावसाळ्यापूर्वीच बंधाऱ्याची स्वच्छता करून झाडेझुडपे हटविणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, बंधाऱ्यावर सिमेंट काँक्रीटमध्ये कोरलेले 'बोरी धरण' हे नाव एकेकाळी नळदुर्ग बसस्थानक परिसरातूनही स्पष्ट दिसत होते. मात्र आता या नावावरही झाडेझुडपे वाढल्याने ते झाकले जात आहे. तसेच वर्षानुवर्षे उन्ह व पावसामुळे नावावरील पांढरा रंगही फिका झाला आहे. त्यामुळे हे नाव पुन्हा आकर्षक आणि ठळक दिसण्यासाठी रंगरंगोटी करण्याची मागणी पुढे आली आहे.

दरम्यान, सध्या बोरी धरणात केवळ १० ते १२ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती मिळत आहे. आगामी काळात नळदुर्ग, तुळजापूर, अणदूर तसेच इतर गावांवर पाणीटंचाईचे संकट ओढवू नये यासाठी धरणातील उपलब्ध पाणी पिण्यासाठी राखीव ठेवावे, अशीही मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## अहंकारी यांच्याकडून नळदुर्गमध्ये शिवराज्याभिषेक सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ जून -**

नळदुर्ग येथील माजी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते शिवभक्त विनायक अहंकारी यांच्या निवासस्थानी ६ जून रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

विनायक अहंकारी हे गेल्या अनेक वर्षांपासून शिवराज्याभिषेक दिनाचे आयोजन करत असून यंदाही त्यांनी आकर्षक सजावटीसह हा सोहळा साजरा केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी परिसरात शिवमय वातावरण निर्माण झाले होते.

या सोहळ्यास नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे, नगरसेवक आकाश कुलकर्णी, नितीन कासार, विलास येडगे, शरद बागल, सरदारसिंग ठाकूर, सुशांत भूमकर, ज्ञानेश्वर घोडके, बलदेवसिंग ठाकूर, नंदकुमार जोशी, मुकुंद भूमकर, श्रमिक पोतदार, सागर हजारे, किशोर जोशी, समीर मोरे, बालाजी कुलकर्णी, मारुती घोडके यांच्यासह शिवभक्त उपस्थित होते.

# पाच महिन्यांपासून कमिशन रखडले; १४२ रेशन दुकानदार आर्थिक संकटात

### १५ जूनपासून धान्य वितरण बंद करण्याचा इशारा; शासनाच्या भूमिकेविरोधात संताप

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.६ जून -**

रेशन धान्य दुकानदारांचे जानेवारी २०२६ पासूनचे कमिशन अद्याप मिळाले नसल्याने कळंब तालुक्यातील १४२ रास्तभाव धान्य दुकानदार गंभीर आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शासनाच्या या भूमिकेमुळे रेशन दुकानदारांना वेठीस धरले जात असल्याची भावना व्यक्त होत असून, त्यांच्या मागे लागलेले आर्थिक ग्रहण सुटणार तरी कधी, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

तालुक्यातील सर्व शिधावाटप व रास्तभाव धान्य दुकानदार केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहेत. मात्र, जानेवारी महिन्यापासून मोफत धान्य वाटपाचे कमिशन (मार्जिन) न मिळाल्यामुळे त्यांच्यासमोर उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

रेशनदुकानदारांकडूनरेशनकार्डधारकांच्या नोंदी अद्ययावत करणे, मृत व्यक्तींची नावे वगळणे, विवाहित महिलांची नावे कमी करणे, नवीन सदस्यांची नोंद करणे, स्थलांतरित कुटुंबांची माहिती अपडेट करणे, आधार आणि मोबाईल क्रमांक लिंक करणे, केवायसी पूर्ण करणे आदी अनेक कामे केली जात आहेत. याशिवाय ई-पॉस मशीनद्वारे बायोमेट्रिक पडताळणी करून धान्य वितरणाची जबाबदारीही दुकानदारांवरच आहे.

केवायसी आणि मोबाईल लिंकिंगसाठी ग्रामपंचायत कार्यालये व रेशन दुकानांमध्ये विशेष शिबिरे घेण्यात आली. मात्र, अनेक लाभार्थ्यांचा अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याने ही प्रक्रिया अद्याप अपूर्ण आहे. तरीदेखील शासनाच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी दुकानदार सातत्याने प्रयत्न करत आहेत.



दरम्यान, धाराशिव जिल्हा रास्तभाव दुकानदार संघटनेने २ जून रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी यांना निवेदन देऊन रखडलेल्या कमिशनबाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली होती. या निवेदनाची दखल घेत जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे यांनी शासनाकडे पाठपुरावा केल्याची माहिती सूत्रांनी दिली. तथापि, पाच महिन्यांचे कमिशन अद्याप न मिळाल्याने दुकानदारांमध्ये तीव्र नाराजी आहे. आर्थिक अडचणींमुळे व्यवसाय टिकवणे कठीण झाले असून, शासनाने तात्काळ कमिशन अदा करावे, अशी मागणी संघटनेने केली आहे.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास १५ जूनपासून रेशन दुकाने बंद ठेवून धान्य वितरण बंद करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. त्यामुळे तालुक्यातील हजारो लाभार्थ्यांच्या धान्य वितरणावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या निवेदनावर काकासाहेब कासार, प्रसाद राजेनिंबाळकर, प्रफुल्ल शेटे, शिवानंद, अमोल काशिद, दिगंबर हावळे यांच्यासह जिल्ह्यातील अनेक रास्तभाव धान्य दुकानदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### रेणापूर ठाण्यात २०७ जणांचे रक्तदान

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि, ६ जुन : येथील पोलीस ठाण्यात शुक्रवार, दि. ५ जुन रोजी आयोजित शिबिरात २०७ रक्तदात्यांनी रक्तदान करुन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

पोलिस अधिक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून इंडियन रेड क्रॉस सोसायटी संचलित भालचंद्र ब्लड बँकेतर्फे रेणापूर पोलीस ठाण्यात शुक्रवारी आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन रेणापूर न्यायालयाचे प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायमूर्ती डी. एम. गीते यांच्या हस्ते झाले. यावेळी पोलिस निरीक्षक सुधारकर देडे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. शिबिरासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र शिंदे, पोलीस उपनिरीक्षक गोपाळ इगे, गोपनिय शाखेचे किरण मडुळे, जाधव, शहराचे बिट जमादार विपिन मामडगे आदींनी परिश्रम घेतले. या वेळी रक्तदान केलेल्या २०७ रक्तदात्यास पोलीस अधीक्षक तांबे यांच्या वतीने हेल्मेट देण्यात आले.

### दगडवाडीत गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन

तभा वृत्तसेवा

किनगाव दि. ६ जून : अहमदपूर तालुक्यातील दगडवाडी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळ्याचे पुजन माजी सरपंच अशोकराव मुंडे यांच्या हस्ते करून विनम्र अभिवादन बुधवारी करण्यात आले आहे. यावेळी सरपंच विश्र्वनाथ मुंडे, उपसरपंच लक्ष्मण गुट्टे व नागरिक उपस्थित होते. सर्वांनी पुष्पहार अर्पन करून अभिवादन केले.

### अहमदपूर शहरातील वीज पुरवठा नेहमी होतोय खंडीत



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. ६ जून : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) लातूर कार्यालयात मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांची भेट घेऊन अहमदपूर शहर आणि विशेष म्हणजे ४ व ५ या प्रभागातील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या समस्येवर चर्चा करण्यात आली व त्यांना यासंबंधीचे अधिकृत निवेदन नगरसेवक ॲड निखिल कासनाळे यांनी दिले आहे.

प्रभागातील जुन्या झालेल्या वीजवाहिन्या, कमकुवत झालेले पोल आणि ओव्हरलोड होणारे डीपी बदलण्याची अत्यंत गरज असल्याबाबत चर्चा करण्यात आली आहे. त्याचबरोबर वीजपुरवठा सुरू असतानाही अनेक भागात व्होल्टेज कमी-अधिक होत असल्यामुळे नागरिकांची घरगुती इलेक्ट्रॉनिक उपकरणे खराब होत आहेत. याकडे त्यांचे लक्ष वेधले. याबरोबरच शहरांमध्ये दररोज सायंकाळी किमान ४ ते ५ वेळेस लाईट जाते. वारे सुटल्यानंतर विद्युत पुरवठा बंद होतो. पाऊस सुरू झाल्यानंतर रात्रभर विद्युत पुरवठा खंडित केला जातो, असे ॲड. कासनाळे यांनी निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रसंगी मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी सर्व मागण्या आणि समस्या अत्यंत सकारात्मकतेने ऐकून घेतल्या. त्यांनी अहमदपूर शहर आणि आपल्या प्रभागातील या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक अधिकाऱ्यांना तातडीने पाहणी करण्याचे आणि आवश्यक त्या तांत्रिक सुधारणा करण्याचे आदेश दिले असल्याचे ॲड. निखिल कासनाळे यांनी सांगितले.

# वडार समाजाच्या प्रश्नांवर उच्चस्तरीय बैठक आ.अभिमन्यू पवार उपस्थित

तभा वृत्तसेवा

औसा दि, ६ जुन : वडार समाजाच्या प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मंत्रालयात महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला आमदार अभिमन्यू पवारही उपस्थित होते. लातूर येथे आयोजित वडार समाजाच्या राज्यस्तरीय मेळाव्यात समाजबांधवांनी मांडलेल्या विविध मागण्या आणि प्रश्नांच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत वडार समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाशी संबंधित विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तांडा वस्तीच्या धर्तीवर 'वडार वस्ती सुधार योजना' सुरू करण्याची मागणी यावेळी प्रमुख्याने मांडण्यात आली. तसेच समाजातील नागरिकांना जातीचे व इतर आवश्यक प्रमाणपत्रे सहज आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

वडार समाजातील नागरिकांची कामगार म्हणून अधिकृत नोंदणी करुन त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देणे. यासह युवक आणि उद्योजकांना उद्योग-व्यवसाय सुरू करण्यासाठी विनातारण बीज भांडवली कर्ज उपलब्ध करून देण्याच्या मागण्यांवरही सकारात्मक चर्चा यावेळी झाली. समाजाच्या आर्थिक सबलीकरणासाठी या मागण्या महत्त्वपूर्ण असल्याचे मत या बैठकीत व्यक्त करण्यात आले.

या बैठकीस इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या संचालक सोनाली मुळे, उपसचिव दिनेश चव्हाण, पशुसंवर्धन विभागाचे सहसचिव नि. भा. मराळे, सहकार विभागाचे उपसचिव विजय भोसले, शिवाजी चव्हाण, कक्ष अधिकारी व्ही. एस. कदम यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव पिराजी मंजुळे, नितीन वाघमारे, भाजपा भटके विमुक्त आघाडीचे सरचिटणीस रविंद्र शिंदे, वडार समाजाचे कार्याध्यक्ष बाळाराम वारकर, रेश्मा जाधव, राजू जाधव, सागर चौघुले, एस. यू. जाधव, प्रभाकर गवारे, कामिनी सकरु, भरत विटकर, दिलीप गुंजाळ, शिवाजी ननवरे आदी मान्यवर उपस्थित होते.

**समाजाच्या विकासासाठी प्रभावी योजना राबविणार : मंत्री अतुल सावे**

मंत्री अतुल सावे यांनी समाजाच्या विविध मागण्यांची गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. वडार समाजाच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. समाजाच्या विकासासाठी विविध विभागांमध्ये समन्वय साधून प्रभावी उपाययोजना राबविण्याचे आश्र्वासनही यावेळी देण्यात आले.

**बैठकीनंतर ठोस निर्णय अपेक्षित**

वडार समाजाच्या दिर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रश्नावर शासन स्तरावर सकारात्मक हालचाली सुरु झाल्याने समाज बांधवामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे, मंत्रालयात झालेली बैठक वडार समाजाच्या विकासासाठी आणि न्यायिक मागण्यांच्या पुर्ततेसाठी महत्वाचा टप्पा मानली जात आहे. मात्र आगामी काळात प्रत्यक्ष अमंलबजावणीच्या दिशेने ठोस निर्णय आपेक्षित आहेत.



**समाजाच्या विकासासाठी पाठपुरावा सुरु ठेवणार - आ. अभिमन्यू पवार**

आमदार अभिमन्यू पवार यांनीही वडार समाजाच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवण्याची भूमिका मांडली. समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी शासन सकारात्मक असून आगामी काळातही समाजाच्या विकासासाठी आवश्यक ती सर्व मदत उपलब्ध करून देण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### शेतातील वाट कोरल्याच्या कारणावरून दोघांना मारहाण

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ६ जून : करखेली (ता. उदगीर) शेतशिवारात शेतातील वाट कोरल्याच्या कारणावरून आरोपींनी फिर्यादीस व फिर्यादीच्या वडिलांस काठीने मारहाण करून जखमी केले. या प्रकरणी उदगीर ग्रामीण पोलिसात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी हरीशांत दिलीप शिंदे (रा. करखेली ता. उदगीर) यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, बुधवारी (दि. ३) सकाळी ९:३० वाजताच्या सुमारास कारखेली शिवारातील फिर्यादीच्या शेतात आरोपी बाळासाहेब कांतराव शिंदे, गजानन कांतराव शिंदे, भिमराव नारायण शिंदे, प्रदीप संतोष शिंदे (सर्व रा. करखेली ता. उदगीर) हे संगणमत करून आले.

फिर्यादीस तहसीलदार यांनी काढून दिलेली वाट का कोरली असे विचारले. फिर्यादीने मी वाट कोरली नाही, तुम्ही वाट मोजून बघा असे सांगितले. तेंव्हा आरोपींनी काठीने फिर्यादीच्या डोक्यात व उजव्या डोळ्याच्या खाली मारून जखमी केले. तसेच फिर्यादीचे वडील दिलीप शिंदे हे भांडण सोडविण्यासाठी आले असता आरोपींनी त्यांच्या पाठीत व शरीरावर काठीने मारहाण करून जखमी केले.

आमचे दोन एक्कर गेले तर गेले पण तुम्हाला खतम करून टाकतो म्हणून जीवे मारण्याची धमकी दिली, अशी तक्रार दाखल केली आहे. त्यावरून आरोपीविरुद्ध गुरनं. ३५२ / २६ कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३ (५) बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

### आ. अमित देशमुख यांनी खंडापूर येथे गावकऱ्यांशी साधला थेट संवाद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ जून : शहराच्या नजीक असलेल्या सर्व गावांमध्ये शहरांप्रमाणेच सर्व

प्रकारच्या आधुनिक आणि मूलभूत सोयी-सुविधा पुरवण्यात येतील. गाव ते लातूर शहर आणि मुख्य हायवेला जोडणारे रस्ते तातडीने दुरुस्त करून दळणवळण अधिक सक्षम केले जाईल, अशी ग्वाही आमदार अमित देशमुख यांनी दिली.

### पहिल्याच दिवशी २७ हजार ३१९ विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वितरण

## औसा तालुक्यातील शिक्षण विभागाचा पुढाकार




तभा वृत्तसेवा

औसा दि.६ जुन : औसा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या १८० व खाजगी ७४ अशा २५४ शाळातील पहिली ते आठवीतील २७ हजार ३१९ शालेय विद्यार्थ्यांना शासनाच्या वतीने शिक्षण विभागाने शुक्रवार दि. ५ रोजी शाळेच्या पहिल्याच दिवशी शालेय पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

समग्र शिक्षा अभियान अंतर्गत २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी शासनाकडून इयत्ता पाहिली ते आठवी वर्गासाठी मोफत पाठ्य पुस्तकांचे शाळा स्तरावर वितरण करण्यास सुरुवात झाली आहे. औसा तालुक्यातील १४ केंद्र आणि औसा शहरातील तीन नोडल मध्ये शाळेच्या पहिल्याच दिवशी तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके हातात मिळतील अशी व्यवस्था शिक्षण विभागाने केली आहे.

यावर्षी इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावी वर्गाचा अभ्यासक्रम बदलला असून सुधारित अभ्यासक्रमांची देखील पुस्तकं पहिल्याच दिवशी शाळा स्तरावर विद्यार्थ्यांना देण्यात आली आहेत.तालुक्यातील मराठी, सेमी आणि उर्दू माध्यमातील पुस्तके याचबरोबर वितरित करण्यात आली आहेत.

तालुक्यात जिल्हा परिषदच्या १८० शाळा तर खाजगी माध्यमाच्या ७४ शाळांना याचा लाभ मिळणार आहे.बदललेल्या अभ्यास क्रमानुसार सर्व शिक्षकांचे प्रशिक्षण देखील पूर्ण झाले असून नवीन शैक्षणिक सत्राच्या पहिल्याच दिवशी मुलांना मोफत पुस्तकं आणि गणवेश देखील मिळणार आहेत.

गट समन्वयक हमीद शेख, केंद्र प्रमुख हुसेन शेख, भागवत जगताप, विशेष शिक्षक सचिन वळके, मंगेश देशमुख विषय साधन व्यक्ती अहिल्या फुटाणे यांच्यासह विभाग प्रमुख विजय राठोड यावेळी उपस्थित होते.

### स्वच्छता आणि हरित निलंगासाठी नगरपालिकेचा पुढाकार



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ६ जून : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त निलंगा नगरपालिकेच्या वतीने शहरात स्वच्छता व वृक्षारोपण अभियान उत्साहात राबविण्यात आले. नगरपालिकेचे मुख्याधिकारी संतोष लोमटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषद कार्यालय परिसर व पाणीटाकी परिसरात विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांनी स्वतः हातात झाडू घेऊन स्वच्छता मोहिमेत श्रमदान करत नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला. स्वच्छ परिसर आणि हरित शहर घडविण्यासाठी नागरिकांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमात माझी वसुंधरा अभियान ७.0 अंतर्गत पर्यावरण संवर्धनाची शपथ तसेच स्वच्छता शपथ घेण्यात आली. याशिवाय नवीन घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२६ संदर्भातील जनजागृतीसाठी स्टिकर वाटप करण्यात आले. एक वृक्ष, हजारो श्र्वास या संकल्पनेतून विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरणाचे रक्षण आणि भावी पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याच्या उद्देशाने उपस्थितांनी अधिकाधिक वृक्ष लागवड व संवर्धन करण्याचा संकल्प केला. या मोहिमेत स्वच्छता सभापती सुधा वाघमारे, नगरसेवक धर्मप्रकाश निंबाळकर, नगरसेवक सचिन गायकवाड, रवी फुलारी, दत्ता मोहोळकर, नगरपरिषदेचे अधिकारी-कर्मचारी तसेच शहरातील नागरिकांनी सक्रिय सहभाग घेतला.

पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमामुळे शहरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, अशा उपक्रमांमधून निलंगा अधिक स्वच्छ व हिरवेगार करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

### आर्ट ऑफ लिव्हिंगचा साडेतीन लाख वृक्ष लागवडीचा उपक्रम





तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ६ जून : वृक्ष लागवडीचे महत्त्व लक्षात घेऊन आर्ट ऑफ लिव्हिंग च्यावतीने यंदाच्या पावसाळ्यात साडेतीन लाख वृक्ष लागवडीचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. लातूरसह मराठवाड्यातील चार जिल्ह्यात हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. लातूर तालुक्यातील

आखरवाई येथे आज जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रातिनिधिक स्वरूपात वृक्ष लागवड करून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी लातूर शहरातील अंकु र बालविकास केंद्राच्या विद्यार्थ्यांच्या हस्ते प्रतिनिधी स्वरूपात वृक्षारोपण करण्यात आले.

मराठवाड्यातील वनक्षेत्राचे घटते प्रमाण लक्षात घेऊन आर्ट ऑफ लिविंगच्या

वतीने 'मिशन ग्रीन अर्थ ट्री प्लॅनिटेशन इन मराठवाडा' हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत यावर्षीच्या पावसाळ्यात लातूरसह धाराशिव, बीड आणि जालना जिल्ह्यात जवळपास साडेतीन लाख वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. यात लातूर जिल्ह्यात दीड लाख तर उर्वरित तीन जिल्ह्यात दोन लाख वृक्ष लावण्यात येणार

आहेत. फळझाडांसह शतायुषी आणि औषधी वनस्पतींचा यात समावेश असणार आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शुक्रवारी लातूर तालुक्यातील आखरवाई शिवारातील वनविभागाच्या जागेत प्रतिनिधिक स्वरूपात १०० वृक्षांची लागवड करून या उपक्रमास सुरुवात करण्यात आली. लातूर शहरातील अंकुर बाल विकास केंद्राच्या विद्यार्थ्यांच्या

हस्ते यावेळी वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

यावेळी आर्ट ऑफ लिविंगचे प्रशिक्षक संजय गायकवाड, व्यंकटेश दापेगावकर, रोहित सरवदे, शंतनु बुधोडकर, विनायक खताळ, अर्जुन खलाटे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

### 'उदयगिरी'त जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ६ जून : महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे कोषाध्यक्ष महादेव नौबदे, सदस्य शिवराज वल्लापूरे, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे, पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जे. एम. पटवारी, डॉ. आर. बी. अलापुरे, पर्यावरण शास्त्र विभागाच्या सहाय्यक संशोधक रोशनी उगीले तसेच शिक्षक व शिक्षकेत्तिर कर्मचारी यांच्या उपस्थितीत पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि भविष्यातील पिढ्यांसाठी हरित पर्यावरण निर्माणि करण्याच्या उद्देशाने विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी वृक्षांचे महत्त्व, वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तसेच प्लास्टिकमुक्त प-िरसर, जलसंवर्धन आणि स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात आली.

धाराशिव
# जिल्हा
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## परंड्यात ७८ हजारांचा गुटखा जप्त; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जून -**

परंडा शहरात प्रतिबंधित गुटखा, तंबाखूजन्य पदार्थ आणि पानमसाल्याची विक्री करण्यासाठी साठवून ठेवलेल्या मालावर अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई करत सुमारे ७८ हजार ७५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दाउद फकीर पठाण (वय ६५, रा. हैदरअली रोड, परंडा) यांनी आपल्या राहत्या घरी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, तंबाखू, पानमसाला, खर्रा व मावा यांचा साठा विक्रीसाठी ठेवला होता.



दि.५ जून २०२६ रोजी सकाळी १० ते ११ वाजण्याच्या सुमारास अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, धाराशिव यांच्या पथकाने केलेल्या तपासणीत हा साठा आढळून आला. त्यानंतर पोलिसांच्या मदतीने कारवाई करून प्रतिबंधित पदार्थांचा संपूर्ण साठा जप्त करण्यात आला.

या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.



# परंड्यात तरुणीवर सामूहिक लैंगिक अत्याचार

### तिघांविरुद्ध ॲट्रॉसिटीसह गंभीर गुन्हा दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जून -**

परंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील २४ वर्षीय तरुणीवर वेगवेगळ्या वेळी लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पीडितेच्या फिर्यादीवरून तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २५ मे ते ३ जून २०२६ या कालावधीत ही घटना घडली. पीडित तरुणी घरी असताना गावातील एका तरुणाने मोबाईल चार्जिंगचे कारण सांगून तिच्याशी संपर्क साधला. त्यानंतर तिला ज्यूस पिण्यास दिल्यानंतर ती बेशुद्धावस्थेत गेली असता तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. तसेच या घटनेचे चित्रीकरण करून कोणाला माहिती दिल्यास व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर गावातील दुसऱ्या एका तरुणाने तिच्या घरी जाऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच ३ जून रोजी गावातील आणखी एका तरुणाने पीडितेला आपल्या घरी नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

पीडितेने ५ जून रोजी दिलेल्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४ (१), ६४ (२), ७७, १२३, ३३३, ३५१ (२) तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्याच्या कलम ३ (२) (व्हीए) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# ऊसतोड कामगारांना प्रमाणपत्र देण्याचे ग्रामसेवकांना निर्देश द्या

### तुळजाभवानी कामगार संघटनेची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जून -**

महाराष्ट्र राज्यातील ऊसतोड कामगारांना त्यांच्या हक्क व अधिकारांचा लाभ मिळवून देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत स्थापन करण्यात आलेल्या ऊसतोड महामंडळाच्या सदस्य नोंदणी अभियानाला गती देण्यासाठी ग्रामसेवकांनी ऊसतोड कामगारांना आवश्यक प्रमाणपत्र तातडीने द्यावे, अशी मागणी तुळजाभवानी कामगार संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आली आहे.

राज्य शासनामार्फत ऊसतोड कामगारांच्या सर्वेक्षण व नोंदणीचे काम हाती घेण्यात आले असून, त्यांना विविध कल्याणकारी योजना व शासकीय सुविधांचा लाभ मिळावा यासाठी ओळखपत्र वितरणाची प्रक्रिया सुरू आहे. या कामासाठी मे. स्मार्ट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या खासगी कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे.

महामंडळाच्या सदस्य नोंदणी प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी ऊसतोड कामगारांकडे ग्रामपंचायत स्तरावरून मिळणारे ऊसतोड कामगार असल्याचे प्रमाणपत्र असणे अनिवार्य करण्यात आले आहे. संगणकीय प्रणालीद्वारे नोंदणी करताना हे प्रमाणपत्र आवश्यक असल्याने अनेक कामगारांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी यांनी धाराशिव जिल्ह्यातील सर्व ग्रामसेवक व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना ऊसतोड कामगारांना आवश्यक प्रमाणपत्र देण्याबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे जिल्ह्यातील हजारो ऊसतोड कामगारांना नोंदणी प्रक्रियेत सहभागी होता येईल आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यास मदत होईल, असे संघटनेचे म्हणणे आहे.

यासंदर्भात तुळजाभवानी कामगार संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश पवार यांच्यासह किरण राठोड, महादेव राठोड, नामदेव राठोड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

ऊसतोड कामगारांच्या नोंदणी प्रक्रियेला गती मिळावी आणि पात्र कामगारांना शासकीय योजनांचा लाभ वेळेत मिळावा, यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा संघटनेकडून व्यक्त करण्यात आली आहे.

## येरमाळ्यात टायगर मटका जुगारावर पोलिसांचा छापा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जून -**

जुगारविरोधी मोहिमेअंतर्गत येरमाळा पोलिसांनी केलेल्या कारवाईत टायगर मटका जुगार चालविणाऱ्या एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून जुगाराचे साहित्य व रोकड जप्त केली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, येरमाळा पोलीस ठाण्याच्या पथकाने ५ जून २०२६ रोजी येरमाळा येथील येडेश्वरी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर शिवकुमार प्रसाद भांडार दुकानासमोर छापा टाकला. या कारवाईदरम्यान अनिल हरी पाडोलकर (वय ३४, रा. पडेगाव, ता. व जि. संभाजीनगर) हा टायगर मटका जुगाराचे साहित्य व रोकड बाळगून जुगार व्यवसाय करत असल्याचे आढळून आले.

छाप्यात जुगाराचे साहित्य व रोख रक्कम असा एकूण ५ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

# जिल्ह्यात गोवंश संरक्षणासाठी पोलिसांची धडक कारवाई

### जनावरे व मांस जप्त; लोहारा येथे चार बैलांची सुटका, उमरग्यात ४० किलो गोमांस जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जून -**



धाराशिव जिल्ह्यात गोवंश संरक्षणासाठी पोलिसांनी दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर वाहतूक आणि गोवंशीय मांस विक्री प्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत. लोहारा आणि उमरगा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत झालेल्या या कारवायांमुळे बेकायदेशीर प्रकारांवर पोलिसांनी धडक मोहीम सुरू केल्याचे दिसून आले.

लोहारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सालेगाव परिसरात ५ जून रोजी दुपारी २.१० वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, आयशर टेम्पो (क्र. एमएच-४४ यू-३८८३) मधून चार गोवंशीय बैलांची कत्तलीसाठी बेकायदेशीर वाहतूक करण्यात येत होती. सालेगाव येथील भीमनगरजवळ वाहन अडवून तपासणी केली असता बैलांना अत्यंत क्रूरपणे कोंबून वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. जनावरांच्या चारा व पाण्याची कोणतीही व्यवस्था करण्यात आली नव्हती.

या प्रकरणी वाहन चालकासह अन्य दोघांविरुद्ध प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियमाच्या कलम ११(१) (ड), (ई), (एच) तसेच संबंधित कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी जनावरांची सुटका करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

दुसऱ्या कारवाईत उमरगा पोलीस ठाण्याच्या पथकाने ५ जून रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास कार्ले प्लॉट परिसरात छापा टाकला. यावेळी बाबा कुरेशी (रा. कार्ले प्लॉट, उमरगा) यांच्याकडे गोवंशीय जनावराचे सुमारे ४० किलो मांस आढळून आले.

जप्त करण्यात आलेल्या मांसाची अंदाजे किंमत ८ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. संबंधित व्यक्ती बेकायदेशीररीत्या मांस विक्री करत असल्याचे तपासात निष्पन्न झाल्यानंतर त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमाच्या कलम ५(क) व ९(अ) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्यांकडून सुरू असून, जिल्ह्यात गोवंशीय जनावरांच्या संरक्षणासाठी आणि बेकायदेशीर वाहतूक तसेच विक्री रोखण्यासाठी कारवाया अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# मद्यधुंद वाहनचालकांवर पोलिसांची कारवाई

### धाराशिव व तामलवाडीत पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जून -**

वाहतूक नियमांचे उल्लंघन करून मद्यधुंद अवस्थेत वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध पोलिसांनी स्वतंत्र कारवाया करत गुन्हे दाखल केले आहेत. आनंदनगर आणि तामलवाडी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ही कारवाई करण्यात आली.

आनंदनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ५ जून रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास श्रीकांत सुंदरराव गायकवाड (वय ४३, रा. भीमनगर, धाराशिव) आणि गंगाधर बबनराव कुलकर्णी (वय ४५, रा. भानुनगर, धाराशिव) हे मोटारसायकल (क्र. एमएच-२५ एझेड-२२९४) वरून सेंट्रल बिल्डिंग चौक ते राधिका बार परिसरात मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचे आढळून आले.

या प्रकरणी दोघांविरुद्ध आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या घटनेत वसंत विश्वनाथ लोखंडे (वय ४६, रा. मराठा गल्ली, लोहा, जि. नांदेड) हे ५ जून रोजी सकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास मारुती ब्रेझा (क्र. एमएच-३७ व्ही-७२००) ही कार मद्यधुंद अवस्थेत चालवत असल्याचे तामलवाडी टोलनाका येथे निदर्शनास आले.

सोलापूर-तुळजापूर मार्गावरील तपासणीदरम्यान पोलिसांनी कारवाई करत संबंधित चालकाविरुद्ध तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला असून, वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात पर्यावरण दिन व निरोप समारंभ




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जून -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपणासह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

कार्यक्रमात प्राचार्य डॉ.व्ही. व्ही. माने, प्रा.आर.ए. पंके व प्रा.एस.बी. सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अंतिम वर्षातील शेख सानिया गौस, गिरीजा भगरे व रिया शिंदे यांनी नामांकित कंपन्यांमध्ये इंटर्नशिप पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच एमपीएससी परीक्षेत यश मिळवलेल्या पाच विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला. निरोप समारंभात विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन आठवणींना उजाळा दिला, तर द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून वातावरण आनंदमय केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायली सोनवणे व दीक्षा मस्के यांनी, तर आभार प्रदर्शन प्रा.ए.एम. पठाण यांनी केले.

# शिक्षकांच्या प्रश्नांसाठी संघटित लढ्याची गरज : आ. प्रवीण स्वामी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ जून -**




शिक्षण क्षेत्रातील वाढत्या समस्या, शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या आणि विद्यार्थ्यांच्या हिताच्या प्रश्नांवर प्रभावीपणे लढा उभारण्यासाठी शिक्षकांनी संघटित होणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन लोहारा-उमरगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी यांनी केले. शिक्षकांच्या न्याय्य मागण्या शासन दरबारी ठामपणे मांडून त्या मार्गी लावण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळा पनवेल येथील व्ही. के. हायस्कूलमध्ये मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात पार पडला. राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने शिक्षक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाल्याने अधिवेशनाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षस्थानी माजी शिक्षक आमदार बाळाराम पाटील होते. यावेळी पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे माजी आमदार दत्तात्रय सावंत, संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले, सरचिटणीस संतोष भोजने, उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, राजेंद्र खैरनार, संपर्कप्रमुख मंगेश सुवर्णकार, रायगड जिल्हाध्यक्ष धनाजी घरत, लहू राक्षे, राजन पाटील, राज्य संघटक प्रशांत शेवाळे, प्राध्यापक विभागप्रमुख प्रा. प्रतिभा पगार, महिला अध्यक्षा रेखाताई सुडे, महिला सरचिटणीस विनया जाधव यांच्यासह राज्यभरातील विभागीय, जिल्हा व तालुकास्तरीय पदाधिकारी उपस्थित होते.

समारोपप्रसंगी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, क्रांतिसूर्य महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसी रत्न पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ भविष्यात अधिक व्यापक, प्रभावी आणि संघटित पद्धतीने कार्य करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# आयटीआय तुळजापूरमध्ये शिवराज्याभिषेक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ जून -**

शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरुजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), तुळजापूर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श राज्यकारभार आणि पंचपरिवर्तन या विषयावर टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (टीआयएसएस), तुळजापूर येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश चादरे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.




छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श राज्यकारभार विद्यार्थ्यांसमोर उलगडला

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. ६ जून १६७४ रोजी रायगडावर झालेला शिवराज्याभिषेक हा भारतीय स्वाभिमान, सुशासन आणि राष्ट्रनिर्मितीचा ऐतिहासिक क्षण असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. मार्गदर्शन करताना गणेश चादरे यांनी शिवनेरीवरील जन्म, राजमाता जिजाऊंचे संस्कार, रायरेश्वर येथे घेतलेली स्वराज्याची शपथ, तोरणा किल्ल्यापासून सुरू झालेला स्वराज्य विस्तार आणि रायगडावरील राज्याभिषेक या घटनांमधून छत्रपती शिवाजी महाराजांचे दूरदर्शी नेतृत्व, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठा विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे मांडली.

तसेच प्रतापगड, राजगड, रायगड, सिंहगड, पन्हाळा, विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग यांसारख्या गड-किल्ल्यांचे स्वराज्याच्या संरक्षणातील महत्त्व त्यांनी विशद केले. शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळ, न्यायनिष्ठ प्रशासन, शेतकरी संरक्षण, स्त्री सन्मान, धार्मिक सहिष्णुता आणि लोककल्याणकारी शासनव्यवस्थेच्या माध्यमातून आदर्श राज्यकारभाराचा पाया रचल्याचे त्यांनी सांगितले.

रयतेचे सुख हेच राजाचे सुख हा शिवरायांचा विचार आजही सुशासनाचा आदर्श मानला जात असल्याचे नमूद करत विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पाटील व्ही. के. (जी.आय.) यांनी केले. सूत्रसंचालन नाईकवाडे यांनी केले, तर रणखांब यांनी आभार मानले.

## उमाकांत गायकवाड यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जून -**

बामसेफची एक शाखा असलेल्या मुलनिवासी संघाच्या धाराशिव जिल्हा प्रभारीपदी सामाजिक कार्यकर्ते उमाकांत गायकवाड यांची निवड जाहीर करण्यात आली. धाराशिव येथे झालेल्या कार्यक्रमात ही घोषणा करण्यात आली.

यावेळी मुलनिवासी संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अंकुश बनसोडे, भारत ननवरे, पी.पी.आय.डी. महाराष्ट्राचे संघटन सचिव मारुती पवार, विजय गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना अंकुश बनसोडे यांनी परिवर्तनासाठी कार्यकर्त्यांनी त्याग व समर्पणाची भूमिका स्वीकारणे आवश्यक असल्याचे सांगितले. फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारधारेनुसार संघटन कार्यरत असून, तरुणांनी मोठ्या संख्येने संघटनेच्या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

# तेर येथून 'विश्वास, विकास व जनकल्याण' अभियानाचा शुभारंभ

### प्रत्येक बूथवर २१ वृक्ष लागवडीचा संकल्प

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.६ जून -**

शिवराज्याभिषेक दिन, जागतिक पर्यावरण दिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या यशस्वी १२ वर्षांच्या पूर्णतेचे औचित्य साधत भारतीय जनता पक्षाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'मोदी सरकारची १२ वर्षे : विश्वास, विकास व जनकल्याण' अभियानाचा शुभारंभ तेर येथून करण्यात येणार आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते शनिवारी वृक्षारोपण करून या अभियानाची जिल्ह्यात सुरुवात होणार आहे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारला ७ जून रोजी १२ वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर ५ जून ते २१ जून २०२६ या कालावधीत विशेष जनसंपर्क व जनकल्याण अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानाचा एक भाग म्हणून तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक मतदान केंद्रावर (बूथवर) किमान २१ वृक्षांची लागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

तेर येथील कार्यक्रमातून धाराशिव जिल्ह्यातील या व्यापक मोहिमेचा प्रारंभ होणार आहे. अभियानांतर्गत वृक्षारोपणाबरोबरच विविध लोककल्याणकारी उपक्रम ही राबविण्यात येणार आहेत. ८ ते १४ जून या कालावधीत मतदारसंघातील ५०० प्रतिष्ठित व्यक्तींच्या भेटी घेण्यात येणार असून शहर आणि ग्रामीण भागात 'प्रगती पथ यात्रा' आयोजित केली जाणार आहे.

तसेच २१ ते ३० जून दरम्यान प्रत्येक तालुक्यात आयुष्मान भारत, प्रधानमंत्री आवास योजना, लखपती दीदी यांसारख्या योजनांसाठी नोंदणी शिबिरे घेण्यात येणार आहेत.

शेतकऱ्यांसाठी नैसर्गिक शेती कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार असून २१ जून रोजी जागतिक योग दिन देखील उत्साहात साजरा केला जाणार आहे.

